CNR No.:-MHRG120004892022

नियमीत दिवाणी दावा क्र. २९/२०२२
देवनाथ व इतर वि. काशिनाथ व इतर

## निशाणी क्र.५ कडील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ३९ नियम १ व २ नुसार मौजे सावरोली, ता. मुरुड, जि. रायगड येथील गट नं.१६/१/अ क्षेत्र ०–४४–५० हे. आर., गट नं.६६/६ क्षेत्र ०–५१–८० हे. आर आणि गट नं.६३/२ क्षेत्र ०–११–४० हे. आर या मिळकतीमध्ये वादींचा १/३ हिस्सा असल्याचे जाहिर करुन मिळण्यासाठी आणि दाव्याचा निकाल लागेपर्यंत प्रतिवादींनी दावा मिळकतीमध्ये त्रयस्त इसमांचे हक्क निर्माण करु नये किंवा दावा मिळकतीची विक्री करु नये असा तात्पुरता मनाई हुकूम मिळण्यासाठी दाखल केला आहे. (सदर मिळकती या पुढे दावा मिळकत म्हणून संबोधण्यात येतील.)

२. अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी यांचे पूर्वगामी कै. पोशा कमळया महाडीक यांचे मालकीच्या व ताबे कब्जेवहिवाटीच्या असून त्यांचे पश्चात वादी व प्रतिवादीं यांच्या वडीलांची सामाईक कब्जेवहिवाटीची मिळकत आहे. प्रतिवादी यांनी वादींना कोणतीही कल्पना न देता गट नं.६६/६ व गट नं.६३/२ या मिळकतीच्या ७/१२ सदरी चुकीचे व खोटे वारस नोंदी करुन घेतल्या आहेत. सदर नोंदी घेत असतांना दोन्ही मिळकतीमधून

वादींचे नाव वगळण्यात आले आहे. दाव्याचा निकाल लागण्यास बराच कालावधी लागणार असून सदर नोंदीचा गैरफायदा घेवून प्रतिवादी यांनी दावा मिळकतीमध्ये त्रयस्त इसमांचे हक्क निर्माण केल्यास अगर दावा मिळकतीची विक्री केल्यास वादींचे अतोनात नुकसान होणार आहे. त्यामुळे वादींनी प्रस्तूतचा अर्ज मंजूर करण्याची मागणी केली आहे.

३. प्रतिवादी यांनी निशाणी क्र.२५ कडे आपले म्हणणे दाखल करुन मिळकतीचे वर्णन योग्य व बरोबर असल्याचे मान्य केले. परंतू, अर्जातील उर्वरित सर्व कथने नाकारली आहेत. प्रतिवादींचे थोडक्यात कथन असे आहे की, कै. पोशा महाडीक यांच्या मृत्यूनंतर प्रतिवादी यांच्या मिळकतीशी वादी यांचा कोणताही संबंध नाही. गट नं.६६/६ आणि गट नं.६३/२ यांच्या उता-यावर त्यांच्या वाडवडीलांची नोंद करण्यात आली नाही. सदर जमिनीच्या ७/१२ सदरी प्रतिवादींच्या नावाची नोंद आवश्यक ती महसूल प्रक्रिया पूर्ण करुन फेरफार नोंद क्र.७९९ आणि फेरफार नोंद क्र.१२१० नुसार करण्यात आली आहे. वादींना प्रतिवादींच्या मिळकतीतून हिस्सा मागण्याचा अधिकार नाही. त्यामुळे त्यांनी प्रस्तूतचा अर्ज फेटाळण्याची मागणी केली आहे.

४. वादीं व प्रतिवादीं यांच्या परस्पर विरोधी कथनावरुन खालील मुद्दे निष्कर्षासाठी माझ्यासमोर प्रस्तुत होतात त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह पुढील

प्रमाणे देण्यात आलेले आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादी त्यांच्या हक्कामध्ये सकृत दर्शनी केस असल्याचे सिध्द करतात का? | **अंशतः होय.** |
| २. | वादी तुलनात्मकदृष्टया न्यायाचा समतोल त्यांच्या बाजूने असल्याचे सिध्द करतात का? | **अंशतः होय.** |
| ३. | वादींचे प्रस्तूतचा अर्ज मंजूर झाला नाही तर त्यांचे पैशाने न भरुन येणार अपरिमित नुकसान होईल असे सिध्द करतात का? | **अंशतः होय.** |
| ४. | आदेश काय? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## कारणमिमांसा

**मुद्दे क्र.१ ते ३ करीता** :-

५. प्रस्तूत अर्जाच्या पुष्ठयात वादींनी निशाणी क्र.४ कडील कागदपत्राच्या यादीसह दावा मिळकतीचे ७/१२ उतारे आणि फेरफार दाखल केली आहे. याउलट प्रतिवादी यांनी त्यांच्या बचावामध्ये निशाणी क्र.३० कडील कागदपत्राच्या यादीसह वाटप करारनामा, चलन, फेरफारच्या नकला आणि ७/१२ उतारे दाखल केले आहे.

६. वादींतर्फे विद्वान वकील श्री. डी. एन. पाटील आणि प्रतिवादींतर्फे विद्वान वकील श्री. आर. एस. पाटील यांचा युक्तीवाद ऐकला. प्रतिवादींच्या विद्वान वकीलांनी युक्तीवाद केला की, दावा मिळकतबाबत अगोदरच वाटप पत्र झाले असून

निशाणी क्र.३० कडील कागदपत्राच्या यादीसह महादू पोशा महाडीक यांनी पैसे भरल्याबाबत ३२ग च्या पावत्या सादर केल्या आहेत. तसेच त्याबाबत फेरफार क्र.७२७ आमलात आणलेला आहे. दावा मिळकतीशी वादींचा कोणताही संबंध नाही. त्यामुळे प्रस्तूतचा अर्ज फेटाळण्यास पात्र आहे.

७. निशाणी क्र.३० कडील कागदपत्राच्या यादीसह दाखल करण्यात आलेल्या चलनाच्या पावत्या वर वादींचे सख्खे आजोबा धर्मा पोशा महाडीक यांच्या हस्ते अशी नोंद असल्याचे दिसून येते. सदर यादीसोबत दाखल करण्यात आलेल्या गट नं.६६/१/६ च्या ७/१२ वर सुध्दा धर्मा पोशा महाडीक यांचे नाव कुळ म्हणून होते व ते कमी करण्यात आले असल्याचे दिसून येते. तसेच सदर यादीसोबत दाखल करण्यात आलेल्या वाटप करारनाम्यावरुन सुध्दा दावा मिळकती प्रतिवादींच्या हिश्यास गेली ही बाब प्रतिवादींचे पूर्वगामी म्हणजेच पोशा महाडीक यांचा मुलगा महादेव उर्फ महादू यांच्या हिश्यास गेली ही बाब स्पष्ट होत नाही. याशिवाय सदर वाटपपत्रामध्ये पोशा महाडीक यांचा मयत मुलगा बाळया पोशा महाडीक अगर त्यांचे वारस यांचे नाव का समाविष्ट नाही याबाबत सुध्दा स्पष्टीकरण प्रतिवादींमार्फत देण्यात आले नाही. वादीं दावा मिळकत वडीलोपार्जित मिळकत असल्याची विशिष्ट केस घेवून आला असून ७/१२ उता-यावर प्रतिवादीं यांची नावे असल्याचे स्पष्ट आहे. अशा परिस्थितीमध्ये सकृत दर्शनी केस वादीच्या बाजूने असल्याचे दिसून येते. तसेच

तुलनात्मकदृष्टया न्यायाचा समतोल सुध्दा वादींच्या बाजूने आहे यामतास मी पोहोचलो आहे. याशिवाय प्रस्तूतचा अर्ज मंजूर केला नाही तर वादींचे पैशाने न भरुन येणारे अतोनात नुकसान होईल यामतास मी पोहोचलो आहे. याठिकाणी असे नमूद करावेसे वाटते की, प्रस्तूत अर्जामध्ये वादींनी दावा मिळकतीमध्ये त्यांचा १/३ हिस्सा असल्याचे जाहिर ठराव करुन मिळण्याची मागणी केली आहे. परंतू, सदरची मागणी सदर अर्जाकामी ग्राहय धरण्यास पात्र ठरत नाही. करिता मी मुद्दा क्र. १ ते ३ यांची उत्तरे अंशतः होकारार्थी देवून खालील आदेश पारित करतो -

**आदेश**

१. अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादीं यांना दाव्याचा निकाल लागेपर्यंत दावा मिळकत त्रयस्त इसमांचे हक्क निर्माण करण्यापासून किंवा विक्री करण्यापासून तात्पुरत्या स्वरुपात मनाई करण्यात येते.

३. पक्षकारांनी अर्जाचा खर्च आपापला सोसावा.

(खुल्या न्यायालयात जाहिर)

SANDEEP G SARODE — Digitally signed by SANDEEP G SARODE Date: 2023.10.21 18:34:11 +0530

(सं. गं. सरोदे)

दिनांक : २१/१०/२०२३ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, मुरूड